मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ
येथील रिट याचिका क्र. ३६१७/२०१८ मधील
दिनांक २३/०२/२०२६ च्या निर्णयानुसार
कार्यवाही करणेबाबत.

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**सामान्य प्रशासन विभाग-१**
**जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/३२५९३१५/४६९/२०२६**
**अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे**

वाचा:- १. माननीय उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचा अंतिम निकाल, दिनांक २३/०२/२०२६.
२. श्री. तखतमल केशरचंद गुगळे यांचा विनंती अर्ज, दिनांक १३/०३/२०२६.
३. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर यांचे पत्र क्र. २५६/२०२६, दिनांक १६/०४/२०२६.

श्री. तखतमल केशरचंद गुगळे, सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग, पंचायत समिती अहिल्यानगर यांनी त्यांच्या सेवा काळातील थकबाकी व वेतन लाभांसाठी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ३६१७/२०१८ दाखल केली होती. सदर याचिकेवर मा.न्यायालयाने दिनांक २३/०२/२०२६ रोजी अंतिम निकाल दिला आहे. तरी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयातील परिच्छेद २१ मधील निर्देशांनुसार, खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

१. श्री. तखतमल केशरचंद गुगळे यांना त्यांच्या सेवा काळातील थकबाकीसाठी न्यायालयाने निश्चित केल्यानुसार एकूण **रुपये १८,६०,२७७/- (अठरा लाख साठ हजार दोनशे सत्याहत्तर रुपये फक्त)** इतकी रक्कम थकबाकी म्हणून मंजूर करण्यात येत आहे.
२. सदर रक्कम काढताना, संबंधित कर्मचाऱ्याने दिनांक ०१/१०/२००९ ते ३०/०९/२०१४ या काळात अन्यत्र काम करून मिळवलेले उत्पन्न (रु. १३,०००/- दरमहा याप्रमाणे एकूण रु. ७,८०,०००/-) वेतनातून वजा करण्यात आले आहे.
३. मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर रकमेवर कोणतेही व्याज देय असणार नाही.
४. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर यांनी सदर बाबत पडताळणी करून, ही रक्कम माननीय न्यायालयाच्या आदेशाच्या दिनांकापासून (२३/०२/२०२६) सहा महिन्यांच्या आत संबंधित कर्मचाऱ्याच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी.

तरी सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करणेत येऊन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202606090460110 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 09-06-2026 19:20:00
(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

..२

प्रति,

श्री. तखतमल केशरचंद गुगळे, सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग, पं.स.अ.नगर
द्वारा:- गट शिक्षणाधिकारी अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर

प्रत:- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव

१. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
२. गट शिक्षणाधिकारी अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर

प्रत:- निवड नस्ती

स्वाक्षरीत/--
(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर